# भास्करराव भावे

## दक्षिण भारतातील आद्य क्रांतीकारक

### (आधुनिक भारताच्या स्वातंत्र्य लढ्यातील सोनेरी पान)



नरगुंद संस्थानचे मूळ पुरूष रामाजीराव दादाजिराव भावे रत्नागिरीहून १६८५ मध्ये नरगुंदला आलेले पहिले चित्पावन कोकणस्थ ब्राह्मण. त्यानंतर १८५८ पर्यंत कोकणस्थ ब्राह्मण म्हणून नावलौकिक मिळविला. (राज्य केले.) ब्रिटीशांच्या अन्याय व अत्याचारा विरूद्ध लढलेले त्या वंशाचा योध्दा म्हणजे भास्करराव भावे.

आई यमुनाबाई व वडील दत्ताजीराव भावे यांचा लाडका मुलगा भास्करराव भावे हे वडिलांच्या निधनानंतर गादीवर १८४२ मध्ये गादीवर बसले तेव्हा त्यांचे वय २८ वर्षांचे होते. पुढे नरगुंदचे वीर म्हणून बाबासाहेब भावे म्हणून प्रसिद्ध झाले. बाबासाहेब हे अत्यंत वीर व सुसंस्कृत होते. त्यांच्या ग्रंथसंग्रहात ४००० संस्कृत ग्रंथ होते. बाबासाहेब भावे कनवाळू होते. दानधर्म सढळ हाताने करीत. नरगुंदमधील व्यंकटेशाचे देऊळ हे बाबासाहेबांचे कुलदैवत. बाबासाहेबांना देवाच्या कृपेने संतान झाले होते पण नंतर ते हिरावून घेतले. मुलाच्या मृत्युनंतर त्यांनी दत्तक घेण्याचा प्रयत्न केला (दु:ख विसरण्यासाठी) परंतु कंपनीने त्यांना परवानगी दिली नाही. १८५० मध्ये लॉर्ड डलहौसीने प्रॉपर्टी रद्दचा कायदा केला त्यामुळे त्याना निपुत्रिक असूनही दत्तक घेणे सरकारमुळे अनिवार्य झाले. या कायद्यामुळे ते जरी ब्रिटीशांना निष्ठावंत असले तरी मिसीजे मॅननेने यांनी दत्तक घेण्याची परवानगी नाकारली. या कारणांमुळे बाबासाहेब रागावले व त्यांनी ब्रिटीशांचा विनाश करण्याचा पण केला. ह्या कायद्यामागे आर्मअॅक्ट लागू करून ब्रिटीश सरकारच्या परवानगीशिवाय शस्त्रास्त्रे बाळगण्याचा हक्क काढून घेतला. या सर्वामुळे ते वाघासारखे चवताळले. दत्तकविधान (प्रॉपर्टी अॅक्ट) व आर्मअॅक्ट मुळे चिडून जाऊन १८५८ मध्ये अवती भवतीच्या संपर्क वाढवून ब्रिटीशांविरुद्ध लढण्याचा निर्णय घेतला.

मुंडरीचे भीमा राय, उंबळचे बहादूर देसाई, हपतगीचे कांचन गौड. गोविंदकोप्पचे देसाई, अनेगोंदीचे श्रीरंग राय इ. बरोबर मिळून क्रांती करायचे ठरविले. ह्याचा सुगावा ब्रिटीशांना लागल्यावर ब्रिटीशांनी बाबासाहेबांवर नजर ठेवली व आर्म अक्टप्रमाणे नरगुंदमधील सर्व शस्त्रास्त्रे धारवाडला पाठविली व काही हरवली असे सांगून काही शस्त्रास्त्रे किल्ल्यावर आणून फिरंग्याची (तोफ) स्थापन केली.

दत्तक घेण्यास विरोध करणारे ब्रिटीश अधिकारी मॅनन यांना रामदुर्गाहून धारवाडला जाताना वाटेत रात्र झाल्याने सुरबान गावी मारूतीच्या देवळात विश्रांती घेत असलेले कळल्यावर बाबासाहेबांनी आपले थोडे सैनिक घेवून मॅनसनवर स्वारी केली. सैनिकांच्या आवाजाने मॅननना जाग आली व अंधारात पिस्तुल हुडकून गोळी मारत असताना बाबासाहेबांचे सैनिक पाठीमागून आले व त्यांनी मॅननना नि:शस्त्र केले. बाबासाहेबांना ज्यांनी नि:शस्त्र केले तो स्वत: नि:शस्त्र झाला. मॅनसनला मारल्यामुळे त्यांचा ब्रिटीशांविरुद्ध जय झाला. नंतर ३१ मे १८५१ मध्ये ब्रिटीश कंपनी सरकारने नरगुंदवर ताबा घेतला. पण किल्ला बंदोबस्त होता. किल्ल्यावर पुरेसा शस्त्र साठा असल्यामुळे बाबासाहेब गुप्त मार्गाने सैनिकांसह गुप्त मार्गाने तोरगलच्या जंगलात आले. एक देशद्रोही फितुराने बाबासाहेब जंगलात असल्याचे बेळगावंचे डी.एस.पी.फ्रँकनॉटर यांना कळविले. त्यांनी जाळे रचून ४-६-१८५८ मध्ये बाबासाहेबांना पकडून बेळगावमध्ये फाशी दिले. तेव्हा बाबासाहेब ५२ वर्षांचे होते. बाबांसाहेबांनी दत्तक घेण्यासाठी बंड केले पण ब्रिटिशांना ते उत्तर भारतात ब्रिटिशाच्या विरुद्ध ब्रिटिशांना हरवण्यासाठी १८५७ साली केलेले बंड असे वाटले.

त्यांच्या मृत्युनंतर त्यांची आई यमुनाबाई व बायको राणी सावित्रीबाई यांनी त्यांच्या जवळील असलेले दागिने दान करून त्यांनी मलकप्रभानदीच्या काठी असलेल्या संगळ या गावी नदीत दोघींनी उडी घेतली. (ब्रिटीशांना चुकवून) बुधीहाळ गावात दोन्ही शव मिळाले. मॅननना मारलेल्या विष्णू कुलकर्णी यांनी दोघीच्यावर संस्कार करून त्या जागेवर दोन अश्वथ वृक्ष लावले. अशा रितीने बाबासाहेब भावे ह्यांच्या संपूर्ण घराण्याने देशासाठी बलिदान दिले. अशा रितीने त्यांच्या साहसाचे पोवाडे अमर झाले आहेत.

- श्री. जी. जे. मेहेंदळे,
हरिहर